


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक ३१३, बुधवार ४ सप्टेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# दोन महिन्यानंतर डबल इंजिन आणि चावीही आपल्याकडे!

## ■ खा. नीलेश लंके यांचा विश्वास ■ लोकसभेपाठोपाठ विधानसभाही मविआकडेच ■ निघोज येथे अभ्यासिका व प्रसादालयाचा शुभारंभ





■ निघोज येथील अभ्यासिकेचा खा. नीलेश लंके यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. ■ निघोज सेवा संस्था व मळगंगा देवस्थान यांच्या वतीने उत्पादित करण्यात आलेल्या अगरबत्ती उत्पादनाचा शुभारंभ खा.लंके यांच्या हस्ते करण्यात आला.

निघोज : संदीप इधाटे

**लोकसभा निवडणूकीमध्ये मतदारांनी आपणास देशाच्या संसदेत पाठविले आता दोन महिन्यानंतर होणाऱ्या विधानसभा निवडणूकीतही महाविकास आघाडीच्या उमेदवाराचाच विजय होणार असून आपल्याकडे डबल इंजिन आणि त्यांची चावीही असणार असल्याचा ठाम विश्वास खासदार नीलेश लंके यांनी व्यक्त केला.**

निघोज येथील शरदचंद्र पवार साहेब स्पर्धा परिक्षा अभ्यासिका तसेच मळगंगा ग्रामीण ट्रस्टच्या प्रसादालयाचे उदघाटन खा. नीलेश लंके यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. देवस्थान ट्रस्टचे कार्याध्यक्ष शांताराम कळसकर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. रयत प्रबाधिनीचे संस्थापक उमेश कुदळे, प्रबोधिनीचे व्यवस्थापक विशाल लोंढे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. सोमनाथ वरखडे यांनी सुत्रसंचलन केले. यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, देवस्थान ट्रस्टच्या पदाधिका-यांनी आपली आमदार झाल्यानंतर आपली भेट घेउन व्यासपीठ, सभामंडपासाठी दहा लाख रूपचांची मागणी केली होती. मात्र जागेच्या अडचणीमुळे हा प्रस्ताव रेंगाळला.

विश्वस्तांनी केलेली मागणी आपल्या लक्षात होती. त्यामुळे सभामंडपाऐवजी दिड कोटी रूपये खर्चाची अभ्यासिका देण्याचा निर्णय आपण घेतला. अभ्यासिका बांधून पुर्ण झाल्यानंतर खा. शरद पवार यांच्या हस्ते अभ्यासिकेचे लोकापर्ण करण्यात आले. आज प्रत्यक्षात स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही अभ्यासिका खुली होत आहे. कान्हूरपठार येथेही एक कोटी रूपये खर्चाची अभ्यासीका उभी राहीली आहे.

यावेळी बाजार समितीचे उपसभापती बापूसाहेब शिर्के, मारूती रेपाळे, वसंत कवाद, अमृताशेठ रसाळ, शांताराम कळसकर, रामदास वरखडे, विश्वास शेटे, विजय डोळ, प्राचार्य डॉ. सहदेव आहेर, ज्ञानेश्वर लंके, बबुशा वरखडे, शिवाजी लंके, संदीप सालके, चंद्रकांत लंके, दत्तात्रेय गुंड, खंडू भुकन, ठकाराम लंके, सुनील वराह, शांताराम लाळगे, रूपेश ढवण, किसनराव रासकर, सोपानराव भाकरे, मळगंगा देवस्थान ट्रस्टचे सर्व विश्वस्त, सोसायटीचे संचालक मंडळ यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

### मिनी दुबई !

निघोज हा आर्थिकदृष्टया सक्षम परीसर आहे. त्यामुळे इथे अधिकाऱ्यांचा तुटवडा आहे. मुंबईत कुलाबा तसेच निघोजमधील दुग्ध व्यवसायामुळे निघोजला मिनी दुबई म्हणून ओळखली जाते. आता निघोजमध्ये स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी अभ्यासिकेची सोय झाली असून भविष्यात निघोजचे अधिकारी राज्यात, देशात दिसले पाहिजेत अशी अपेक्षा खा. लंके यांनी व्यक्त केली.

### पुढच्या वर्षी यशाचा गुलाल उधळू !

धामिक स्थळांकडून ज्ञानमंदीरासाठी मदत होते आहे अशी घटना क्वचितच घडते. निघोजमध्ये मळगंगा देवस्थानने त्यासाठी पुढाकार घेतला ही आनंदाची बाब आहे. या अभ्यासिकेत अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे काम आम्ही मोफत करू. या कामाचा आम्हीही भाग असावे ही मळगंगा देवीची इच्छा होती. पुढील वर्षी इथेच यशाचा गुलाल उधळू.

उमेश कुदळे
संस्थापक, रयत प्रबोधिनी

### म्हणून मी राजकारणात आलो

अभ्यासिकेचे व्यवस्थापन करण्यासाठी, मार्गदर्शन करण्यासाठी अभ्यासू माणसांची गरज असल्याचे सांगताना खा. लंके म्हणाले, अभ्यासाशी माझा जास्त सबंध आला नाही. अभ्यास केला असता तर मी अधिकारी झालो असतो. अभ्यास न केल्यामुळे मी राजकारणात आलो.

### रयत प्रबोधिनी सर्वात मोठी अभ्यासिका

रयत प्रबोधिनीमार्फत अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. भाउराव पाटील यांनी सुरू केलेल्या रयत शिक्षण संस्थेमार्फत शिक्षण दिल्यानंतर अनेक विद्यार्थी अधिकारी झाले. याच धर्तीवर रयत प्रबोधिनी काम करते. १० हजार ऑनलाईन तर १ हजार विद्यार्थी ऑफलाईन अभ्यास करत आहेत. इतक्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारी ही राज्यातील सर्वात मोठी अभ्यासिका असून या प्रबोधिनीमध्ये आर्थिक निकष न पाहता हुषार, होतकरू विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येते. या प्रबोधिनीने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पुण्यामध्ये शिक्षणाची कवाडे उघडून दिली असून या संस्थेतून एकच वेळी तब्बल ८५० विद्यार्थी राज्य लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झाले असल्याचे खा. लंके यांनी यावेळी सांगितले.

### विधानसभेनंतर मंदिरासमोर व्यासपीठ

मळगंगा देवस्थानसाठी पाच कोटींची कामे देण्यात आली असून ती सध्या निविदा प्रक्रीयेत आहेत. आपणखी चार ते पाच रस्त्यांना लवकरच मंजुरी मिळेल. मंदिरासमोर व्यासपीठ उभारण्याचीही आपली तयारी असून विधानसभा निवडणूकीनंतर आठ दिवसांत त्याचा नारळ फोडू असे खा. लंके म्हणाले.

### २४ तास चालणारी अगरबत्ती !

निघोज सोसायटी तसेच मळगंगा देवस्थानच्या वतीने अगरबत्ती निर्मीती करण्यात येत आहे. एकूण ६४ प्रकारच्या अगरबत्तींचे उत्पादन करण्यात येत आहे. २४ तास न विझणारी आगरबत्तीचेही उत्पादन करण्यात आले असून देशातील ही सर्वात मोठी आगरबत्ती असल्याचे खा. लंके म्हणाले.

### ज्ञानमंदिराला मदत करा

या अभ्यासिकेमुळे अनेक पिढया घडणार असून त्यासाठी ग्रामस्थांनी सढळ हाताने मदत करण्याचे आवाहन खा. लंके यांनी यावेळी केले. या अभ्यासिकेसाठी आवष्यक ती मदत आपणाकडूनही करण्यात येईल अशी ग्वाही खा. लंके यांनी यावेळी दिली. कॉन्फरन्स हॉलसाठी १० लाख रूपयांचा निधी उपलब्ध करून देण्याची घोषणाही लंके यांनी केली.

### अभ्यासिका प्रेरणादायी ठरेल

या अभ्यासिकेचे व्यवस्थापन मळगंगा ट्रस्टकडे देण्यात आल्याने या अभ्यासिकेचा स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणा-या विद्यार्थ्यांसाठी चांगला फायदा होईल याचा मला विश्वास आहे. निघोज येथील अभ्यासिका राज्यासाठी प्रेरणादायी असेल असेही खा. लंके म्हणाले.

### खा. लंके यांच्या आवाहानास प्रतिसाद

अभ्यासिकेसाठी मदत करण्याचे आवाहन खा. लंके यांनी केल्यानंतर उपस्थितांनी त्यास तात्काळ प्रतिसाद दिला. विष्णू लोखंडे ११ हजार , बाबा रामभाऊ पानमंद ११ हजार, पोपटराव रसाळ १५ हजार, चंद्रकांत लंके ११ हजार, सतिश घुले ११ हजार, खंडू घुले ११ हजार, बाबाजी पठारे ११ हजार, अर्जुन कवाद ५ हजार, नामदेव थोरात ११ हजार, महेंद्र शेटे ५ हजार, यशवंत वराळ ५ हजार, भास्कर पवार ७ हजार ७७५ , धनंजय गोर्डे ५ हजार, शंकर लामखडे ११ हजार, साईनाथ पवार भिवंडी ७ हजार ७७७, पोपटराव लंके ५ हजार, मळगंगा देवस्थानचे सर्व विश्वस्त ५१ हजार रूपयांची देणगी देण्याची घोषणा यावेळी करण्यात आली. तर सहाययक निबंधक गणेश औटी तसेच शिवाजी लंके मित्र मंडळाच्या वतीने यावेळी पुस्तके भेट देण्यात आली.

### जबाबदारी निश्चित करावी लागेल

मतदारसंघात मी सर्वाधिक जीमसाठी निधी दिला. आज त्यांची काय अवस्था आहे ? अनेक जीममधील साहित्याची चोरी झाली आहे. त्यासाठी विकास कामे झाल्यावर त्याची जबाबदारी प्रत्येक गावातील व्यक्तींवर टाकावी लागेल असेही खा. लंके म्हणाले.

### भोजनाचा दर्जा कायम ठेवा

मळगंगा देवस्थानच्या वतीने वीस रूपयांत जेवण देण्यात येणार असून शुभारंभानिमित्त मळगंगा देवीला दाखविलेल्या नैवेद्याप्रमाणेच भोजनाचा दर्जा भविष्यातही कायम ठेवण्याचे आवाहन खा. लंके यांनी यावेळी केले. आपल्या वाढदिवसाचा अनावष्यक खर्च टाकून देवस्थाकडे २ हजार १०० रूपयांची देणगी द्या, त्या पैशांतून प्रसादालयात जेवण देण्यात येणार असल्याचे लंके यांनी सांगितले.

### खा. लंके यांनी शान वाढविली

खा. नीलेश लंके यांनी आपल्या कार्यकर्तुत्वावर आमदार, खासदार पदाची शान वाढविल्याचे शांताराम कळसकर यांनी यावेळी बोलताना सांगितले. आमदार म्हणून काम करताना त्यांनी निघोज व परीसरात कोटयावधी रूपयांची कामे राबविली असून त्यामुळे परिसराचा चेहरा मोहरा बदलल्याचेही कळसकर म्हणाले.






# युवा

## पुरुषांनो वयाला कमी करायचंय?

**महिला असो किंवा पुरुष, काही जणांचे वय त्यांच्या चेहऱ्यावरून लक्षात येते. वाढत्या वयोमानानुसार चेहऱ्यावर सुरकुत्या येणे, डोळ्यांखाली काळी वर्तुळे येणे, मुरुमांचे डाग आदी परिणाम चेहऱ्यावर दिसू लागतात. चेहऱ्याशी संबंधित समस्या उद्‌भवू नये, यासाठी योग्य पद्धतीनं काळजी घेणे आवश्यक आहे. महिलांच्या तुलनेत पुरुषांच्या चेहऱ्यावर वाढत्या वयाचे परिणाम लगेच दिसून येतात. त्वचेची योग्य देखभाल न करणे, वाईट सवयी आणि केमिकलयुक्त प्रोडक्टचा भडीमार यामुळे त्वचेवरील नैसर्गिक तेल आणि चमक नाहीशी होऊ लागते. ज्यामुळे कमी वयातच वृद्धत्वाची लक्षणे दिसू लागतात. शिवाय वयाच्या तिशीनंतर शारीरिक प्रक्रियांमध्येही बरेच बदल होतात. ज्यामुळे त्वचेमध्ये नवीन पेशींची निर्मिती होण्याची क्षमता कमी होऊ लागते. परिणामी त्वचेमधील कोलेजन आणि प्रोटीन देखील कमी होते. यामुळे वाढत्या वयासोबत त्वचेवर परिणाम दिसू लागतात. त्वचेशी संबंधित उद्भवणाऱ्या समस्यांमुळे तुम्ही देखील त्रस्त आहात का ? जाणून घेऊया काही सोप्या स्किन केअर टिप्स...**



### रेटिनोइडचा वापर करा

तुम्ही देखील तिशीच्या आसपास पोहोचले आहात, तर रेटिनोइडचा समावेश असलेल्या प्रोडक्टचा वापर करावा. रेटिनोइड हे रेटिनॉल प्रमाणे कार्य करते. रेटिनोइड हे त्वचेमध्ये नवीन कोलेजन उत्तेजित करण्यास मदत करते. यामुळे चेहऱ्यावरील सुरकुत्या आणि डाग दूर होण्यास मदत मिळते.

### कोणते क्लींझर वापरताय ?

काही जण तेलकट त्वचेमुळे त्रस्त असतात. ही समस्या दूर करण्यासाठी केमिकलयुक्त साबण, फेस वॉश तसंच क्लींझरचा वापर केला जातो. पण यामुळे चेहऱ्यावरील नैसर्गिक तेल आणि मॉइश्चराइझरवर दुष्परिणाम होतात. त्वचा रुक्ष आणि कोरडी होऊ लागते. असे झाल्यास त्वचेशी संबंधित गंभीर समस्या उद्भवण्याची शक्यता असते. त्वचा कोरडी झाल्यास चेहऱ्यावरील ग्लो कमी होतो. ज्यामुळे तुम्ही म्हातारे दिसू लागता.

### डोळ्यांना लावा क्रीम

डोळ्यांमुळेही आपल्या सौंदर्यामध्ये भर पडते. पण डार्क सर्कलमुळे सौंदर्यामध्ये बाधा निर्माण होते. जर तुमचे वय ३० ते ३५ च्या आसपास असेल तर डोळ्यांच्या आसपास तसंच चेहऱ्यावर सुरकुत्या येणं सामान्य बाब आहे. पण ही समस्या दूर करण्यासाठी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार एखादी क्रीम डोळ्यांच्या आसपासच्या त्वचेवर लावण्यास सुरुवात करा.

### त्वचा ठेवा हायड्रेट

त्वचा हायड्रेट राहण्यासाठी दिवसभरामध्ये भरपूर प्रमाणात पाणी प्या. शरीर डिटॉक्स करण्याची ही नैसर्गिक आणि सोपी प्रक्रिया आहे. पाण्यामुळे चेहऱ्यावर चमक वाढते. पाण्यामुळे त्वचा निरोगी, मऊ आणि चमकदार राहण्यात मदत मिळते. आंघोळ केल्यानंतर त्वचेवर हायड्रेटिंग लोशन देखील लावा.

### चुकीच्या सवयी सोडून द्या

दैनंदिन जीवनातील चुकीच्या सवयींमुळेही आपल्या त्वचेवर वाईट परिणाम होत असतात. उदाहरणार्थ मद्य सेवन, सिगारेट ओढणे इत्यादी वाईट सवयींमुळे आपल्या त्वचेचं भरपूर नुकसान होते. अंमली पदार्थांच्या सेवनामुळे केवळ चेहऱ्यावरच नव्हे तर संपूर्ण शरीरावरही नकारात्मक परिणाम होतात. यामुळे गंभीर आजारांचीही लागण होते.

### पूर्ण झोप घ्या

सुंदर आणि नितळ चेहऱ्यासाठी योग्य प्रमाणात झोप घेणे देखील महत्त्वाचे आहे. नियमित किमान सात ते आठ तासांची झोप घ्यावी. पुरेशा प्रमाणात झोप घेतल्यास आरोग्यावर सकारात्मक परिणाम होतात. शारीरिक तसंच मानसिक आरोग्यही चांगलं राहते. महत्त्वाचे म्हणजे तुमची त्वचा तरुण राहण्यास मदत मिळेल. यामुळेच पूर्ण झोप घेणे आवश्यक आहे.

## चॅटिंग स्टाईलला भुलू नका



**चॅटिंग हा हल्ली अनेकांच्या आवडीचा विषय झाला आहे. एखाद्या व्यक्तीशी आपण जितकं समोरून बोलत नाही. तितकं चॅटिंगमधून बोलतो. मनातील सगळ्या भावना आपण यातून व्यक्त करतो. खासगी विषय, रोमँटीक बोलणे अनेकदा चॅटच्या माध्यमातून होत असते. पण काही व्यक्तींसोबत चॅटिंगमध्येही आपला बाँड जुळत नाही, तर काहींची चॅटिंग स्टाईल ही आपल्याला कायम आकर्षित करून घेतात. पण या चॅटिंग स्टाईलला अजिबात भुलू नका. कारण अशा बोलण्यातून तुम्ही फसवणूक होऊ शकते. ऑनलाईन कोणत्याही नव्या माणसाशी चॅट करताना काही गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात. कारण या गोष्टी लक्षात ठेवल्या तर तुमची कोणाकडूनही फसवणूक होणार नाही.**

### या गोष्टी ठेवा लक्षात

- ऑनलाईनमध्ये किती फ्रॉड होतो हे तुम्हाला सगळ्यांना माहीत आहे. ऑनलाईन जर तुम्हाला चॅटसाठी नवीन रिक्वेस्ट आली असेल. ती रिक्वेस्ट ॲक्सेप्ट करण्याआधी त्या व्यक्तीची प्रोफाईल जाऊन बघा. कारण त्यावरुन अनेक गोष्टी स्पष्ट होतात. जर त्या प्रोफाईलमध्ये काहीच खरे वाटत नसेल तर तुम्ही अशा प्रोफाईलशी फारसा संबंध ठेवणे टाळा.
- एखाद्या व्यक्तीची प्रोफईल योग्य वाटत असेल आणि तुमच्या फ्रेंडसर्कलपैकी कोणतीतरी ओळखीची असेल तरी देखील अशा व्यक्तीशी पटकन बोलायला जाऊ नका. अशा व्यक्तींशी बोलतानाही तुम्ही याची काळजी घ्या.
- काही जणांना उगाचच काहीपण मेसेज पाठवायची सवय असते. काही मेसेज हे टाईप केलेले असतात. अशा मेसेजना मुद्दामून रिप्लाय करायला अजिबात जाऊ नका. उदा. सणांच्या शुभेच्छा... कारण या शुभेच्छा सगळ्यांना पाठवल्या जातात. तुम्ही जर अशांना उगाच मेसेज केला तर कारण नसताना तुम्ही उगाचच संपर्क वाढवत असतात.
- काही जणांना उगाचच गुड मॉर्निंग, ब्युटीफुल असे गोड काही मेसेज करण्याची खूप सवय असते. अशी लोक कोणीतरी मेसेजला रिप्लाय करण्याची वाटच पाहात असतात. अशांना रिप्लाय दिल्यानंतर उगाचच त्या व्यक्ती तुम्हला सतत मेसेज करत राहतात.
- एखाद्या व्यक्तीशी तुम्ही काही दिवसांपासून चॅट करत असाल. ती व्यक्ती तुमच्या कोणत्याही परिचयाची नसताना आणि त्यांच्या फोटोची कोणतीही खात्री नसताना तुम्ही त्यांच्याशी अधिक बोलायला जाऊ नका. एखादे संभाषण सुरू झाले असेल तर खात्री पटल्यानंतर तुम्ही कमी करा.
- काही लोक संभाषणातून तुमच्या सौंदर्याची तारीफ करत असतील, तुमच्यावर प्रेम केल्याचा दावा करत असतील. तर अशा व्यक्तींवर पटकन विश्वास ठेवू नका. काहींचे गोड बोलणे आणि सतत तुमच्या सौंदर्याची तारीफ करणे याकडे लक्ष देऊ नका. अशा व्यक्ती तुम्हाला कमकुवत करण्याचे काम करतात. तुमच्या आयुष्यात जर प्रेमाचा कोपरा हळवा असेल तर तुम्ही या गर्तेत अधिक आत जाऊ शकता. त्यामुळे योग्य पद्धतीने अशा व्यक्तींशी बोला.
- जर तुम्ही एखाद्या प्रसिद्धीच्या क्षेत्राशी निगडीत असाल तर तुम्हाला अशा पद्धतीचे मेसेज आणि चॅटिंग रिक्वेस्ट येणे स्वाभाविक आहे. अशावेळी माहीत नसलेल्या लोकांशी चॅट करू नका.
- पैशांची मागणी करणे आणि लुटणे हा नवा प्रकार सध्या सोशल मीडियावर सुरु आहे. तुम्हाला अनोळखी व्यक्तींशी बोलायचे असेल तरी या ट्रॅपला अजिबात भुलू नका. कारण या लोकांना तुम्हाला लुबाडणे इतकेच माहीत असते. फार मोठी रक्कम नाही पण अगदी १ हजार रुपयांपासून याची सुरुवात होते.
- जर तुम्ही ऑनलाइन डेटिंगवर विश्वास ठेवत असाल तर चॅट करा, पण असे करताना लगेचच एखाद्या व्यक्तीला भेटायला मुळीच जाऊ नका. कारण एखाद्या अनोळख्या व्यक्तीला भेटणे हे तसे धोक्याचे असते. जोपर्यंत तुम्हाला पूर्ण विश्वास होत नाही तोपर्यंत मुळीच भेटू नका. ऑनलाइन ओळखीवरून अनेकांची लग्न झालेली आहेत. पण त्यासाठी तुम्हाला सगळ्या गोष्टींची योग्य माहिती घेणे गरजेचे असते.
- ऑनलाईन चॅटिंग करताना एखादी व्यक्ती जर तुम्हाला फार खासगी आणि सेक्शुअली बोलत असेल आणि त्याचे बोलणे तुम्हाला खटकत असेल तर तुम्ही मुळीच चॅट वाढवू नका. त्या व्यक्तीला तुम्ही तिथेच ब्लॉक करा आणि याची माहिती इतरांनाही द्या.कारण आता चॅटिंग करताना या गोष्टी तुम्ही कायम लक्षात ठेवा.

### ऑनलाइन नाते जुळवताना...

**ऑनलाईन डेटिंग ॲप्लिकेशनद्वारे अनेक अपराध होताना दिसतात. हल्ली तर हे प्रमाण जास्त वाढलं आहे. अनेक तरुण आणि तरुणी याचा फायदा घेताना दिसतात. पण यामुळे काही जण बदला घेण्यासाठीही त्याचा उपयोग करून घेतात. ब्लॅकमेल करणे, फोटो सेव्ह करणे आणि अन्य गोष्टींचा यासाठी उपयोग करण्यात येतो.**



#### ✓ खरे कसे ओळखावे ?

समोरच्या व्यक्तीचा फोटो मागा. त्याच्याविषयी तुम्ही इंटरनेटवर अधिक माहिती गोळा करण्याचा प्रयत्न करा. तसंच त्याच्या कुटुंबाचे प्रोफाईलही तपासा. त्यांचे फोटो आणि इतर त्याने सांगितलेली माहिती बरोबर आहे का ते तपासून घ्या. हे सर्व तुम्ही योग्य तऱ्हेने तपासले तरच तुम्हाला समोरचा व्यक्ती खरे बोलत आहे की नाही याची माहिती कळू शकते. समोरचा व्यक्ती जर आपल्या नातेवाईकांबद्दल खोटे सांगत असेल तर तुम्हाला पटकन कळू शकते.

#### ✓ सावधान राहण्यासाठी...

प्रोफाईल हाईड हा पर्याय निवडा आणि जास्त फोटो अपलोड करू नका. कोणत्याही अनोळखी व्यक्तीशी जास्त जवळीक साधू नका. चर्चा करू नका. जितकी माहिती देणं गरेजचं वाटतं तितकीच द्या. ऑनलाईट डेटिंग ॲप्लिकेशनवर आपली वैयक्तिक माहिती जास्त देऊ नका. ऑनलाईन डेटिंग ॲप डाऊनलोड करताना तुमचा फोन जर कोणती परवानगी मागत असेल तर विचारपूर्वक तसे करा. बरेचदा फोन गॅलरी, कॅमेरा, माईक, रेकॉर्डर अन्य फिचरची परवानगी ॲप्लिकेशन वापरताना मागितली जाते. यामुळे हॅक होण्याची शक्यता असते. त्यामुळे काळजी घेऊन मगच माहिती अपलोड करा.

## नात्यात फसवणूक ओळखायची?

**भारतात लग्न हे एक अतिशय पवित्र नाते आहे. लग्नात आयुष्यभरासाठी एकमेकांसोबत अतूट नात्यात राहणं हे महत्त्वाचं असते. पण लव्ह मॅरेज असो की अरेंज्ड मॅरेज, कोणीही आपला पार्टनर इतर कोणाशीही शेअर करू शकत नाही. लग्न केल्यानंतर आपल्या जोडीदारासोबत प्रामाणिक राहणे ही गोष्टी महत्त्वाची असते. पण आजकालच्या काळात नात्यांमध्ये फसवणूक होण्याची समस्या खूपच वाढली आहे. यामुळे नात्यात दुरावा निर्माण होतो. तुमच्या पतीचे विवाहबाह्य संबंध तर चालत नाहीत ना हे तुम्हालाही जाणून घ्यायचे असेल तर या लक्षणांवरून ओळखा...**

- स्वतःकडे जास्त लक्ष देणे : जेव्हा एखादा माणूस प्रेमात असतो किंवा एखाद्यासोबतच्या नात्याच्या सुरुवातीला तो स्वतःकडे खूप लक्ष देतो. त्याचे व्यक्तिमत्व आकर्षक बनवण्याचा प्रयत्न करतो. जर तुमचा नवरा देखील असे करत असेल तर हे लक्षण असू शकते की कोणीतरी त्याच्या आयुष्यात प्रवेश केला आहे. पण या गोष्टीची आधी खात्री करा, मगच पतीला विचारा.
- तुलना इतरांशी करणे : जर तुमचा नवरा तुमची तुलना इतर कोणत्याही महिलेशी करत असेल तर समजा की त्याला आता तुमच्यात कमतरता दिसू लागल्या आहेत. अनेक वेळा असे घडते कारण तुमचा नवरा तुमच्यामध्ये दुसऱ्या स्त्रीचा चांगुलपणा शोधत असतो. अशावेळी तुमच्यातील त्यांचा रस कमी झाला आहे ही गोष्टी स्पष्ट होते.
- फोनवर चिकटून राहणे : जर तुमचा पती फोनवर बराच वेळ चिकटून असेल. त्याचा फोन नेहमी त्याच्याजवळ ठेवत असेल. तर समजून घ्या की कुठेतरी काहीतरी गडबड आहे. त्याच्या मनामध्ये तुम्ही त्यांचा फोन चेक कराल ही भीती असते.



- बॉडी लँग्वेजमध्ये बदल : जर तुमच्या पतीचे हावभाव बदलत असतील तर ते दुसऱ्या महिलेमुळे असू शकते. अशा स्थितीत लोक ऑफिसमध्ये जास्त काम असल्याची सबब पुढे करतात. बाहेर जास्त वेळ घालवायला सुरुवात करतात. अशावेळी ते तुमच्यासोबत वेळ घालवणे टाळतात, मग समजून घ्या की काहीतरी गडबड आहे.
- जवळीक नसणे : वैवाहिक नात्यात शारीरिक जवळीक सर्वात महत्त्वाची असते. तुमच्या नात्यात ते बिघडत असेल तर काळजी घ्या. जर तुमच्या पतीला तुमचा स्पर्श आवडत नसेल किंवा तुमच्याबद्दल भावना नसतील तर ते तुमच्यासाठी एक मोठे लक्षण असू शकते. अनेकवेळा या गोष्टी बाहेर सापडल्या की बायकोसोबत या गोष्टी कमी होतात. जर तुमच्या बाबतीतही ही गोष्ट होत असेल तर सावध होणे गरजेचे आहे.



## अशा तरुणींसोबत लग्नाची नसते कुणाची इच्छा!

**प्रत्येक व्यक्तीला कोणत्या- न्- कोणत्या गोष्टींचा राग येतोच, कारण त्या गोष्टी ती अथवा तो अजिबात सहन करू शकत नाहीत. महिला व पुरुषांबाबत सांगायचे झाले तर, काही महिला विशिष्ट प्रकारच्या पुरुषांपासून दूर राहणेच पसंत करतात, तर पुरुषही विशिष्ट प्रकारच्या महिलांपासून स्वतःला दूर ठेवतात. पुरुषांना महिलांच्या काही सवयी अजिबात आवडत नाहीत, ज्यापासून ते अनेकदा दूर राहण्याचा पर्याय निवडतात. अशा महिला जोडीदार झाल्यानंतर त्यांच्या सवयी लक्षात आल्यास नात्यात दुरावा निर्माण होण्यास वेळ लागत नाही. तुमच्यातही अशा सवयी असतील तर त्या सुधारण्याची गरज आहे, अन्यथा लग्नाच्या बाबतीत तुम्हाला पश्चाताप करावा लागू शकतो. चला जाणून घेऊया सविस्तर...**



- दुर्लक्ष करण्याची सवय : काही तरुणींना सतत आपल्या बॉयफ्रेंडच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करण्याची सवय असते. जोडीदाराने आपल्या मागे- मागे करावे, याकरीता काही महिला त्यांच्याकडे दुर्लक्ष करतात. पण अशा महिलांची ही सवय त्यांच्यावर भारी पडू शकते. पुरुष अशा महिलांपासून दूर पळू लागतात. जर तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत असेच वागत असाल तर लवकरच ते तुमच्यापासून दूर होण्याची शक्यता आहे. जर तुम्ही तुमच्या प्रियकराला किंवा कोणत्याही मुलाला तुमच्या इशाऱ्यावर नाचवण्याचा विचार करत असाल तर काही काळानंतर ते स्वतःला या नात्यातून मुक्त करण्याचे ठरवतील.
- हुकूम गाजवणाऱ्या महिला : पुरुषांना हुकूम गाजवणाऱ्या स्वभावाच्या महिला आवडत नाहीत. तसेही पुरुषांमध्ये अहंकार जरा जास्तच असतो आणि तो पटकन दुखावलाही जातो. अहंकार ही चांगली गोष्ट नाही, परंतु जेव्हा तुम्ही त्यांना हुकूम देण्यास सुरुवात करता तेव्हा त्यांचा स्वाभिमानही दुखावतो. जर तुमचा स्वभाव असा असेल तर तुम्हाला तो बदलायला हवा नाहीतर तुमचा बॉयफ्रेंड लग्नाचा विचार करू शकणार नाही.
- छोट्या छोट्या गोष्टींचा हेवा वाटणे : रिलेशनशिपमध्ये थोडासाही मत्सर-द्वेष योग्य मानला जात नाही. पण या सवयीने मर्यादा ओलांडली तर पुरुष अशा महिलांपासून दूर पळतात. आवश्यकतेपेक्षा अधिक हेवा वाटणे, ही गोष्ट महिलांना आवडत नाही.

### सवयी सुधारणे

पुरुषमंडळी आपल्या जोडीदारामध्ये स्वतःच्या आईची छवी नक्कीच पाहत असतात. पण आपण त्याच्या सवयी सुधारण्याकरीता मर्यादेपेक्षा अधिक त्यांच्या मागे लागता तेव्हा त्याची चिडचिड होऊ लागते. आपण त्याची काळजी घ्यावी, अशी त्याची इच्छा असते. परंतु प्रत्येक छोट्या गोष्टीत व्यत्यय आणणे त्याला आवडत नाही. प्रत्येक गोष्टीवर कटकट करणाऱ्या मुलींपासून मुलांना दूर राहायला आवडते.

त्यामुळे तुमची ही सवय पुरुष सहन करतील अशी अपेक्षा करणे योग्य ठरणार नाही. सतर्क राहणे महत्त्वाचे आहे, पण तितकेच आपल्या जोडीदारावर विश्वास ठेवणेही महत्त्वाचे आहे.

- खासगी वेळेत लुडबुड करणं : आपण सतत आपल्या जोडीदाराबरोबर राहावे, अशी इच्छा एखाद्या महिलेनं बॉयफ्रेंडजवळ व्यक्त केली तर सुरुवातीला त्याला चांगलं वाटेल. पण कालांतरानं याचा त्याला कंटाळा येऊ शकतो. आपल्या खासगी वेळेत कोणीही लुडबुड



करू नये, अशी प्रत्येकाचीच इच्छा असते. वारंवार फोन- मेसेज करून बॉयफ्रेंडच्या खासगी आयुष्यात हस्तक्षेप करत असाल तर त्याला ते मुळीच आवडणार नाही. यामुळे तुमच्या नात्यात दुरावा निर्माण होऊ शकतो.

## शॉर्ट न्यूज

### परिक्रमाच्या तीन विद्यार्थी रौप्य पदकाचे मानकरी

**श्रीगोंदा :** काष्टी (ता. श्रीगोंदा) येथील परिक्रमा शैक्षणिक संकुलचे तीन खेळाडू जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत रौप्य पदकाचे मानकरी ठरले आहेत. कर्जत येथील दादा पाटील महाविद्यालयात झालेल्या जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत १७ वयोगटात ७१ किलो वजनी गटात राजवर्धन खरात, १९ वर्ष ७४ किलो वजनी गटात समीर शेख, तर १९ वयोगटात ९७ किलो वजनी गटात साहिल देवकर यांनी उत्कृष्ट खेळ करत रौप्यपदक मिळविले.

### तिघांना उपनिरीक्षक पदावर पदोन्नती

**पारनेर :** सुपा पोलीस ठाण्यातील तीन सहायक फौजदार (सहायक पोलीस उपनिरीक्षक) यांना पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) पदावर पदोन्नती मिळाली आहे. रमेश शिंदे, सुनील कुटे व सुनीता भिंगारदिवे यांचा यामध्ये समावेश आहे. या तिघांनी पोलीस दलात ३० ते ३५ वर्षे सेवा दिली असून त्यांनी विविध पोलीस ठाण्यात काम केले आहे. स्वच्छ व प्रामाणिकपणे सेवा देत देशाप्रती आपले कर्तव्य बजावले आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन त्यांना पदोन्नती देण्यात आली आहे. नगर जिल्हा पोलीस दलातील ९९ जणांना नुकतीच पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती देण्यात आली.

### माजी महसूल मंत्री थोरात यांचा सत्कार

**संगमनेर :** अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस वर्किंग कमिटीच्या सदस्यपदी राज्याचे माजी महसूल मंत्री आमदार बाळासाहेब थोरात यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना (ता. संगमनेर) येथे झालेल्या सत्कार सोहळ्याप्रसंगी काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष जयंत वाघ, प्रदेश काँग्रेस कमिटी सदस्य संपतराव म्हस्के, नगर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी चेअरमन बाबासाहेब गुंजाळ, साहेबराव बोडखे, सामाजिक कार्यकर्ते नाना डोंगरे, गोरख चौरे, सुनील जाधव आदी उपस्थित होते.

### शिवप्रेमींकडून महामार्ग अडवून रास्तारोको

**नेवासा :** महाविकास आघाडीच्या वतीने नेवासा फाटा येथे सोमवारी छत्रपती संभाजी नगर अहमदनगर महामार्ग अडवून रस्तारोको आंदोलन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांची मालवाडा येथील मूर्ती अचानक कोसळल्याने महाविकास आघाडीने रस्ता रोको केला. यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे गणेश झगरे यांच्या यांच्या मार्गदर्शनाखाली एक तास रस्तारोको करण्यात आला.

# विसापूर प्रकल्पाचा कुकडी प्रकल्पात समावेश करा

## खा. नीलेश लंके यांची मागणी



**नगर : प्रतिनिधी**

**श्रीगोंदे तालुक्यातील कुकडी मध्यम प्रकल्पाचा कुकडी प्रकल्पामध्ये समावेश करण्याची मागणी खासदार नीलेश लंके यांनी कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळाच्या कार्यकारी संचालकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

यासंदर्भात खा. लंके यांनी निवेदनात नमुद केले आहे की, माझ्या मतदारसंघातील विसापुर मध्यम प्रकल्प सन १९२० मध्यम प्रकल्प बांधून पुर्ण झाला. पुर्वीच्या काळात पावसाचे प्रमाण जास्त असल्याने हंगा नदी पाणलोट क्षेत्रातील पावसाच्या पाण्यामुळे विसापुर प्रकल्पात पुर्ण क्षमतेने पाणी साठा होत होता.

निवेदनात पुढे नमुद करण्यात आले आहे की, हंगा नदीच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या शंभर वर्षात अनेक तलाव, बंधारे झाल्यामुळे तसेच पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे विसापुर धरणात प्रत्येक वर्षी पाण्याचा पुर्ण साठा होत नाही. हा तलाव कुकडी डावा कालावा कि. मी.११४ जवळ असून कुकडी प्रकल्पाचे पाणी सोडण्यासाठी गेटही आहेत. त्यामुळे पाणी सोडण्यासाठी शासनाला वेगळा खर्च करण्याची आवष्यकता भासणार नसल्याचे खा. लंके यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

विसापुर प्रकल्पाचे लाभक्षेत्र व कुकडी डावा कालवा लाभक्षेत्र सद्यस्थितीत एकच झाले आहे. त्यामुळे कुकडी डावा कालव्याचे पाणी प्रत्येक अवर्तनाला विसापुर प्रकल्पात सोडण्यासाठी या प्रकल्पाचा कुकडी प्रकल्पात समावेश करण्यात यावा. असे झाल्यास या पाण्याचा उपयोग विसापुर लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या शेतीला होउन शासनाच्या महसूली उत्पन्नात भर पडले अशी खात्री व्यक्त करतानाच खा. लंके यांनी विसापुर मध्यम प्रकल्पाचा कुकडी प्रकल्पात समावेश करण्याची मागणी खा. लंके यांनी केली आहे. जलसंपदा विभागाच्या मुख्य अभियंत्यांनाही खा. लंके यांनी निवेदनाची प्रत पाठविली आहे.

# जन्मठेपेची शिक्षा लागलेल्या १९ वर्षांपासून फरार आरोपी जेरबंद

## जेरबंद करण्याचे न्यायालयाने दिले होते आदेश



**नगर : प्रतिनिधी**

**पत्नीच्या खुनाच्या गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा लागलेल्या व १९ वर्षांपासून फरार आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सोमवारी जेरबंद केला. मच्छिंद्र शंकर कदम (वय ६४, रा. मांजरसुंबा, ता. नगर) असे जेरबंद आरोपीचे नाव आहे. आरोपी मच्छिंद्र कदमने १९ वर्षांपूर्वी त्याची पत्नी आशा हिचा माहेरून पैसे आणावेत यासाठी मारहाण करून विष देत खून केला होता. या प्रकरणी बाळासाहेब ससे यांच्या फिर्यादीवरून मच्छिंद्र विरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल झाला होता.**

पोलिसांनी या प्रकरणी न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते. न्यायालयाने दोन्ही पक्षांचे युक्तीवाद ऐकून घेत उपलब्ध पुराव्यांच्या आधारे मच्छिंद्रला दोषी धरत जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. या निकालावर मच्छिंद्रने उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात अपील दाखल केली. औरंगाबाद खंडपीठानेही त्याचा दोषी ठरवत जिल्हा न्यायालयाने दिलेली शिक्षा कायम ठेवली होती. तेव्हापासून तो फरार होता. त्याला शोधून जेरबंद करण्याचे आदेश न्यायालयाने पोलीस प्रशासनाला दिले होते.

जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक मच्छिंद्रला शोधण्यासाठी मांजरसुंबा येथे गेले होते. तेथे माहिती घेतली असता आरोपी मच्छिंद्र हा वारंवार ठिकाणे बदल असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने अधिक तपास केला असता आरोपी मच्छिंद्र हा वांबोरी शासकीय विश्रामगृहात असल्याची माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार पथकाने सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले.

# छत्रपतींचा पुतळा पडल्याच्या निषेधार्थ रास्ता रोको

**■ भरपावसात केले आंदोलन ■ नेवासे फाटा येथे शिवप्रेमींकडून संताप**



**नेवासा : प्रतिनिधी**

**नेवासे फाट्यावरील राजमुद्रा चौकात शिवप्रेमीकडून नगर- छत्रपती संभाजीनगर महामार्गावर सोमवारी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. राजकोट किल्ल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अनावरण केलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा अवघ्या आठ महिन्यांत कोसळलेला. या घटनेच्या निषेध नेवासे येथील शिवप्रेमींनी व्यक्त केला.**

नेवासे तालुक्यात या घटनेविरोधात संतापाची लाट उसळली. शिवप्रेमीकडून आक्रमक भूमिका घेत आंदोलने करण्यात येत आहेत. नेवासे फाटा येथील राजमुद्रा चौकात शिवप्रेमींकडून अहमदनगर- छत्रपती संभाजीनगर महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलक संभाजी माळवदे म्हणाले, राज्यात छत्रपतींचा पुतळा कोसळला. बदलापूर येथे आमच्या बहिणीवर अत्याचार झाले. शेतकरी आत्महत्या, विद्यार्थी आत्महत्या करत आहेत. मराठा आरक्षण प्रश्न चिघळत आहे. शासकीय भर्तीमध्ये घोटाळा झाले. अशा अनेक विषयावर आवाज उठवल्यास सरकार म्हणते, राजकारण करू नका. असे किती दिवस जनतेला गप्प बसवणार आहात. याचा उद्रेक आता होणार आहे.

ॲड. कल्याणराव पिसाळ यांनी पुतळ्याचे काम करणाऱ्या ठेकेदारावर, बिल काढणाऱ्यावर, यात सहभागी सरकारच्या मर्जीतील व्यक्तीवर नेवासे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला पाहिजे, अशी मागणी केली. सरकार कोणाचेही असो. परंतु मालवण घटनेमुळे महाराष्ट्राचा स्वाभिमान मात्र जमीनदोस्त झाला, असे सांगितले.

गणेश झगरे यांनी राजकोट येथे नुसता पुतळा कोसळला नाही, तर मराठी माणसाची अस्मिताच कोसळली, असे सांगत मालवण घटनेचा निषेध केला. गणपत मोरे यांनी लोकसभा डोळ्यासमोर ठेवून इव्हेंट करण्याच्या घाईत पंतप्रधान अनावरण करतात, श्रेय घेतात. आज नौदलावर खापर फोडतात. मग आज जबाबदारी झटकून टाकता. याला जबाबदार राज्य व केंद्र सरकार आहे. महायुतीला याचे प्रायश्चित भोगावे लागेल, असे सांगितले. आकाश धनवटे यांनी सर्व घटनेचा शोध स्वतंत्र यंत्रणेद्वारे करावा, असे स्पष्ट करत मालवण घटनेचे परिणाम भाजपसह महायुतीला भोगावे लागतील, असे सांगितले.

यावेळी भर पावसात दिलेल्या जय भवानी, जय शिवाजी, जय जिजाऊ, जय शिवरायच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला. या आंदोलनात काँग्रेसचे अंजुम पटेल, सतीश तऱ्हाळ, संतोष काळे, बसपाचे विकास चव्हाण, बबलू डांगे, तुषार उंदरे, शेषराव गव्हाणे, त्रिंबक भदगले, मीराताई गुंजाळ, सुमित पटारे यांच्यासह शिवप्रेमींनी सहभाग घेतला. यावेळी आंदोलकांनी ठेकेदार व यातील दोषींवर नेवासे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करावा, असे निवेदन पोलिस उपनिरीक्षक मनोज आहिरे यांना दिले.

## तीर्थ दर्शन योजनेसाठी नगर रेल्वे स्थानकातून रेल्वे सोडणार

### महानगरपालिकेचा पुढाकार



**नगर : प्रतिनिधी**

**राज्य शासनाने सुरू केलेल्या मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेअंतर्गत शहरातील जास्तीत-जास्त लाभार्थ्यांना देवदर्शनची संधी उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका प्रशासनाने पुढाकार घेतला आहे.**

नगर शहरातील दीड हजार ज्येष्ठ नागरिकांना या योजनेतून अयोध्या दर्शन घडवण्याचे नियोजन करण्यात येत आहे. नगर रेल्वे स्थानकावरून यासाठी रेल्वे सोडण्यात येणार आहे. यासाठी इच्छुक व पात्र लाभार्थ्यांना अर्ज भरून द्यावा लागणार आहे. हे अर्ज महापालिकेच्या चारही प्रभाग समिती कार्यालयात नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

या योजनेसाठी ६० वर्ष वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिक लाभार्थी **महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा** कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा जास्त नसावे तपासणीअंती शारीरिकदृष्ट्या निरोगी प्रवासासाठी सक्षम असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

# जाती-धर्मावरून द्वेष पसरवला तर गाठ माझ्याशी !

## डॉ. सुजय विखेंचा राणेंना इशारा




**शिर्डी : प्रतिनिधी**

**अनेक वर्षांपासून आपण एकोप्याने राहतो आहे. त्यामुळे जाती धर्म पाहून आम्ही काम करत नाही. मतदारसंघात जाती धर्मावरून द्वेष पसरवला तर गाठ माझ्याशी आहे, असे माजी खासदार सुजय विखे यांनी भाजपचे आमदार नितेश राणे यांना नाव न घेता खडेबोल सुनावले आहे.**

शिर्डीतील एका सोहळ्यात विखे यांनी जातीच्या राजकारणावर भाष्य करत राणे यांना खडेबोल सुनावले आहे. दरम्यान, भाजपचे आमदार नितेश राणे यांनी नगर येथे भाषणावेळी मुस्लिम समाजाबद्दल वादग्रस्त वक्तव्य केलं होतं. महंत रामगिरी महाराज यांच्या समर्थनार्थ आणि बांगलादेशातील हिंदू अत्याचाराविरोधात सकल हिंदू समाजातर्फे नगरमध्ये नितेश राणे यांच्या उपस्थितीत मोर्चा काढण्यात आला. यावेळी ते बोलत होते. दरम्यान, याच मुद्यावरून मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या प्रकरणी नितेश राणे यांच्यावर नगर येथे गुन्हा देखील दाखल झाला होता.

अशातच आता या प्रकरणात भाजप नेते सुजय विखे पाटील म्हणाले, ''हिंदू-मुस्लिम ऐक्य आहे आणि ते कायम राहिले पाहिजे. तीस वर्षात आम्ही कधीही जात विचारली नाही. मात्र, हल्ली जातीचे विष पसरवणारे लोक जनतेला आता नको झाले आहे. याच शिर्डीमध्ये साईबाबांनी सर्वधर्मसमभावाचा संदेश दिला आणि तो संदेश आपल्याला भविष्यात देशभराला द्यायचा आहे.

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2

डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
● प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
● गर्भपिशवीचे आजार
- अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
● Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
नोंदणी क्र. महा. ३९६/२२
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION + OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच

मेजर भगवान नांगरे सर
✻ आमची वैशिष्ट्ये ✻
✻ १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
✻ एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
✻ प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
✻ मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
✻ अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
✻ PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
✻ पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
✻ ॲडमिशन ओपन ✻
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# भोयरे गांगर्डामध्ये श्रावणी बैल पोळा उत्साहात साजरा

### बैलांची वाजत गाजत मिरवणूक । घरांना आंब्याच्या पानांची तोरणे



■ भोयरे गांगर्डा ता. पारनेर येथे श्रावणी बैल पोळा उत्साहात साजरा करण्यात आला. (छाया - शरद रसाळ, सुपा)

सुपा : प्रतिनिधी

**श्रावणी बैलपोळा पारनेर तालुक्यातील अनेक गावांमध्ये सोमवारी उत्साहात साजरा करण्यात आला. बैलांची वाजत गाजत मिरवणुक काढून सायंकाळी त्यांना पुरणपोळीचा घास भरविण्यात आला. भैरवनाथ मंदिर परिसरात बैलपोळा उत्सवानिमित्त बैलांची भव्य मिरवणूक काढण्यात आली.सध्या शेतकरी यांत्रिक पद्धतीने शेती करतात. ट्रॅक्टर व इतर यांत्रिक अवजारांच्या वापरामुळे बैलाचे महत्त्व काहीसे कमी झाले आहे. ठराविक शेतकऱ्यांकडे शेतीच्या मशागतीसाठी बैल शिल्लक असून अशा शेतकऱ्यांनी मोठ्या उत्साहात बैलपोळा सण साजरा केला.**

बैलांना सकाळी नदी, ओढे नाल्यांवर नेवून स्वच्छ अंघोळ घालण्यात आली. दुपारपासून बैलांना सजविण्याची लगबग सुरू होती. बैलांच्या शिंगांना सोनेरी रंग लावून त्यांना झुली चढवून सजविण्यात आले. त्यानंतर सायंकाळी बैलांच्या वाजत गाजत मिरवणुका काढण्यात आल्या. पारंपारिक वाद्य मिरवणुकीच्या बैल हे अग्रभागी होते. शेतकऱ्यांनी बैलांपुढे नाचून आनंद साजरा केला. सायंकाळी घरी पुरणपोळीचा गोड घास बैलांना भरविण्यात आला.

दरम्यान, ज्यांच्या घरी बैल नाही त्यांनी मातीच्या बैलांची पुजा केली. सुपा, भोयरे गांगर्डा गावांमध्ये मातीचे बैल मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी ठेवण्यात आले होते. रंगबिरंगी मातीच्या बैलजोडीला चांगली मागणी होती. मोठी बैलजोडी २०० ते २५० रुपये मध्यम बैलजोडी १०० ते १५० तर छोटे मातीचे बैल ७० ते १०० रुपयांना विकले जात होते. या मातीच्या बैलांची घरी नेवून पूजा करण्यात आली. भोयरे गांगर्डा येथे पारंपारिक पद्धतीने बैलपोळा सण साजरा करण्यात आला.

आंब्याच्या पानाची तोरणे घराला बांधण्याची येथे परंपरा असून बैलपोळ्यानिमित्त सर्वच घरांना सकाळी ही तोरणे बांधण्यात आली. सायंकाळी बैलांची आकर्षक मिरवणुक काढण्यात आली.

# अहिल्यानगर नावाला केंद्रीय रेल्वे मंत्रालयाचा हिरवा कंदील

### ■ नामांतराचा मार्ग सुकर ■ पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची माहिती

नगर : प्रतिनिधी

**जिल्ह्याला अहिल्यानगर नाव देण्यास केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने हिरवा कंदिल दिला असून, हे नाव देण्यास विभागाची कोणतीही हरकत नसल्याचे पत्र दिल्याने जिल्ह्याच्या नामांतराचा मार्ग सुकर झाला असल्याचे महसूल तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले.**

जिल्ह्याला पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे नाव देण्याची मागणी झाल्यानंतर राज्यातील महायुती सरकारने अहिल्यानगर असे नाव देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला. नामांतराच्या बाबतीतील सर्व प्रक्रीया ही केंद्र सरकारच्या अखत्यारीत पुर्ण होत असल्याने प्रत्येक विभागाची ना हरकत आवश्यक असते.



केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने नामांतराच्या बाबतीत हरकत नसल्याचे पत्र जारी करुन, अहिल्यानगर नावास मान्यता दिली आहे. या नावाचे कोणतेही रेल्वेस्थानक देशात नसल्याचेही त्यांनी आपल्या पत्रात नमुद केल्याने जिल्ह्याला अहिल्यानगर नाव देण्यातील पहिला टप्पा पुर्ण होत असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

# तेहमीना पिरजादे यांची शिक्षक सेवकपदी निवड

निघोज : प्रतिनिधी

**शंताप्रभू प्रशालेच्या पंढरपूर येथे पवित्र पोर्टल मार्फत होणारी शिक्षक भरतीचा निकाल जाहीर झाला ज्यात संकल्प क्लासेस निघोजच्या संचालिका सौ. तेहमीना अन्सार पटेल (पिरजादे) यांनी प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होऊन शिक्षण सेवक पदी नियुक्ती करण्यात आली.**

निघोजमध्ये तेहमिणा पिरजादे यांचे गणित या विषयासाठी खूप मोठे नाव आहे. त्यांच्या या यशासाठी त्यांनी खूप मेहनत घेतली केंद्र शासनाची सीईटी परीक्षा दोन वेळा तर



महाराष्ट्र शासनाची टीईटी परीक्षा उत्तीर्ण होण्याचा बहुमान त्यांच्या कडे आहे.निघोज मध्ये कुठलीही मदत नसताना केवळ गुणवत्तेच्या जीवावर पटेल पती व पत्नी ने २०० वर विद्यार्थी संख्या नेली. संकल्प क्लासेसचा ५ वी व ८वीचा शिष्युरुत्ती निकाल या सर्व उत्कृष्ट असतो. एक उत्तम विद्यार्थी घडण्यावाच काम मॅडम नेहेमीच करताना दिसतात. सौ.पटेल मॅडम चे संकल्प क्लासेस निघोज परिवार तर्फे अभिंदन करण्यात आले. या व्यतिरिक्त ढवळपुरी ग्रामस्थ, बरागाव नांदूर या ग्रामस्थांनी अभिनंदन करत सत्कार केला.

# श्रमदानाबरोबरच विद्यार्थ्यांनी लुटला वनभोजनाचा आनंद

### चुंबळेश्वर मंदिर परिसरात स्वच्छता अभियान



(छाया - शरद रसाळ, सुपा)

सुपा : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील नारायणगव्हाण येथील ब्लूमिंग बड्स इंग्लिश मिडीयम स्कूलमधील विद्यार्थ्यांनी श्रमदान करत वनभोजनाचा आनंद लुटला.**

श्रावण महिन्यातील सुंदर नटलेल्या डोंगरांमधील निसर्गरम्य वातावरणात लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना रमायला आवडते. दररोजच्या शैक्षणिक उपक्रमांमधून विद्यार्थ्यांसाठी प्रशालेच्या विद्यार्थी व शिक्षकांनी नारायणगव्हाण मधील प्रसिद्ध चुंबळेश्वर मंदिर परिसरात जाऊन निसर्गाचा आनंद लुटला.

यावेळी विद्यार्थ्यांनी चुंबळेश्वर मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम राबवली. मंदिर परिसरात असलेला कचरा, मंदिराच्या भोवती असणाऱ्या बगीचा मधील उगवलेले गवत त्याचबरोबर मंदिर गाभाऱ्यातील स्वच्छता विद्यार्थ्यांनी केली. यावेळी भाविकांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. विद्यार्थ्यांनी यावेळी आपल्या कृतीतून दाखवून दिले की, ज्ञानदान, अन्नदान, वस्त्रदान, कन्यादान याचबरोबर समाजाला आपल्या सर्वांगीण आरोग्यासाठी श्रमदान हे सुद्धा महत्त्वाचे आहे.

यावेळी प्राचार्य धनंजय नाईक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर जया शेळके, निलम शेळके, जया खेमनर, रूपाली शेळके, पूनम आढाव आदी शिक्षकांचे सहकार्य लाभले, प्रीतीलता हांडे यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

# मार्तंडनाना पठारे विचार मंचाचे वतीने कारेगावमध्ये वृक्षारोपण

### ग्रामपंचायतीने घेतली वृक्षसंवर्धनाची जबाबदारी

कारेगाव : प्रतिनिधी

**स्व.मार्तंडनाना पठारे विचार मंच पारनेर तालुकाच्या वतीने नुकतेच कारेगाव ग्रामपंचायतचे मागणीनुसार वृक्षारोपण करण्यात आले मार्ग वस्ती ते कारेगाव गावठाण दरम्यान रस्त्याचे दुतर्फा वृक्षांची लागवड मंचामार्फत केली वृक्ष संवर्धनाची जबाबदारी ग्रामपंचायत कारेगाव यांनी घेतलेली आहे.**

वृक्षारोपण वडगाव सावताळचे माजी सरपंच व सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब शिंदे व माजी नगरसेवक ज्ञानदेव पांडुळे मंत्री व दीपक पठारे यांचे हस्ते करण्यात आले.

भविष्य काळामध्ये मार्तंडनाना पठारे विचार मंचाचे वतीने तालुक्यातील बहुतांश गावामध्ये वृक्षारोपणाची मोहीम हाती घेतलेली आहे माजी जिल्हा परिषद सदस्य स्वर्गीय मार्तंड नाना पठारे यांचे राजकीय त्याबरोबरच सामाजिक क्षेत्रात मोठे योगदान राहिले होते. त्यांच्या नावाने सुरू केलेल्या विचार मंचाचे तालुकाभर मोठे संघटना असून मार्तंडनाना पठारे यांना मानणाऱ्या सर्व जुन्या व नवीन कार्यकर्त्यांचा मेळ घालून लवकरच विचार मंचाचे वतीने विचार मंचाच्या पदाधिकाऱ्यांची निवड केली जाणार आहे.

सदर वृक्षारोपण प्रसंगी माजी पंचायत समिती सदस्य व कोरठण खंडोबा देवस्थानचे उपाध्यक्ष राजेंद्र चौधरी ,पिंपळगाव रोठा सरपंच पती ॲड.संतोष वाळुंज, रामदास पठारे पिंपळगाव रोठा सोसायटीचे चेअरमन गंगाधर कोळेकर ॲड.सचिन पठारे पिंपळगावचे माजी सरपंच अशोक घुले



पत्रकार शशी भालेकर कोरठण देवस्थानचे विश्वस्त चंद्रभान ठुबे कारेगाव चे सरपंच बापूराव ठुबे अशोक पंडित सावकार मुळे साहेबराव खरात बाळू घुले बाबाजी घुले साहेबराव चिकणे स्वप्निल जगताप बबन मुळे वसंत खरात पोपट वाफारे नवनाथ ठुबे ज्ञानदेव घुले शिवाजी गुंजाळ प्रकाश ठुबे विष्णू ठुबे उत्तम ठुबे शरद जगदाळे बाळासाहेब जेडगुले जालिंदर राजदेव गीताराम गुंजाळ लक्ष्मण खरात सुभाष खरात शेखर घुले जिजाभाऊ घुले गोरख घुले भास्कर भालेकर विलास पठारे गणेश पठारे उत्तम नगरे सोपान गवते कारेगाव पिंपळगाव रोठा नांदूर पठार वाफारेवाडी पारनेर सह मुंबईकर पुणेकर आदी उपस्थित होते.

**विविध भागात होणार वृक्षारोपण**

**कै.मार्तंड नाना पठारे यांचे राजकीय कार्य मोठे होते तसेच सामाजिक क्षेत्रातही त्यांनी काम केले आहे त्याच सामाजिकतेच्या धर्तीवर तालुक्यात मार्तंडनाना पठारे विचारमंचाच्यावतीने वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे तालुक्यातील विविध भागात वृक्षारोपण करण्यात येणार असल्याचे विचार मंचच्या कार्यकर्त्यांनी सांगितले आहे.**

# कलेशी मैत्री केल्यास मानसिक तणाव येत नाही - ॲड .प्रियंका खुळे




पारनेर : प्रतिनिधी

**विश्वास नांगरे पाटील, थॉमस एडिसन यांनी जीवनात यश संपादन केले त्यासाठी त्यांनाही खूप संघर्ष करावा लागला आहे. प्राप्त परिस्थिती स्वीकारून ध्येयप्राप्तीसाठी वाटचाल करा. असे प्रतिपादन प्रा. ॲड. प्रियंका खुळे यांनी केले.**

पारनेर येथे न्यू आर्टस्, कॉमर्स अण्ड सायन्स महाविद्यालयात विद्यार्थिनींसाठी प्रेरणा व जागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर हे होते.

प्रा. ॲड. प्रियंका खुळे पुढे म्हणाल्या, जीवनात ज्या गोष्टी करायला शक्य नसतील त्याला नाही म्हणायला शिका. ताण तणाव निर्माण होण्याची प्रमुख कारणे म्हणजे सोशल मीडियाचा अतिरिक्त वापर, पुरेशी झोप न घेणे, सकस आहाराचा अभाव, बदलेली जीवनपद्धती याचा परिणाम शारीरिक व मानसिक आरोग्यावर होतो. ताण तणावाचे व्यवस्थापन करताना नियमित व्यायाम, पुरेशी झोप, सोशल मीडियाचा आवश्यक तेवढाच वापर करावा तसेच विद्यार्थीनींनी अभ्यास व जीवनात जे ध्येय प्राप्त करायचे आहे यालाच प्राधान्य दिले पाहिजे. विचार व कृती यामध्ये साम्य असले पाहिजे. कोणताही निर्णय विचारपूर्वक घ्यावा.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर म्हणाले, विद्यार्थीनींनी सकारात्मक विचार केल्यास व चांगले पुस्तके वाचल्यास ताण तणावाचे व्यवस्थापन करता येते. आपले आयुष्य हे समोर आलेल्या जेवणाच्या ताटासारखे आहे. त्याच्यात वेगवेगळे पदार्थ आहेत परंतु आपल्याला जे पचेल तेच आपण घेतले पाहिजे. आपल्याला ज्या गोष्टी करायच्या आहेत त्या आपण स्वीकार स्वीकारल्या पाहिजेत.

याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे, महिला सक्षमीकरण कक्षाच्या समन्वयक डॉ. सरिता कुडंलीकर, प्रा. ज्योत्स्ना म्हस्के, प्रा. राणी सोनवणे, डॉ. माया लहारे, प्रा. विद्या फंड व सर्व महिला प्राध्यापिका उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. प्रतीक्षा तनपुरे यांनी केले तर, सुत्रसंचालन प्रा. शुभदा आर्डे यांनी केले तर आभार डॉ. प्रांजली भराटे यांनी मानले.

# खेळाकडे करीअरची संधी म्हणून पहावे

### प्राचार्य बी .बी अंबाडे यांचे प्रतिपादन



(छाया - शरद रसाळ, सुपा)

सुपा : प्रतिनिधी

**विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच खेळाकडे विशेष लक्ष द्यावे. खेळाकडे करिअरची संधी म्हणून पहावे असे प्रतिपादन प्रवरा पब्लिक स्कूलचे प्राचार्य बी. बी.अंबाडे यांनी केले.**

**प्रवरा पब्लिक स्कूल प्रवरानगर येथे अहमदनगर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशन द्वारे आयोजित जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.**

दोन दिवस चाललेल्या या स्पर्धेत अहमदनगर जिल्ह्यातील जवळपास ११०० खेळाडूंनी सहभाग नोंदविला. १४, १६, १८, २० व २३ वर्ष वयोगटासाठी या स्पर्धा झाल्या. या स्पर्धेतील प्रथम दोन क्रमांक प्राप्त खेळाडू दि. १९ ते २२ सप्टेंबर दरम्यान बालेवाडी पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत अहमदनगर जिल्ह्याचे नेतृत्व करणार असल्याचे सचिव दिनेश भालेराव यांनी सांगितले.

या स्पर्धा पूर्ण करण्यासाठी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था अध्यक्ष नामदार राधाकृष्ण विखे पाटील व सचिव डॉ . सुष्मिता विखे पाटील यांनी शाळेचे मैदान व क्रीडा साहित्य उपलब्ध करून दिले.

या स्पर्धेसाठी पंच म्हणून क्रीडा शिक्षक रमेश वाघमारे, रमेश दळे, दिपक जाधव, राहुल काळे, प्रतीक दळे, किरण कडस्कर, अतुलडे, संदीप घावटे, सुजित बाबर, श्रीरामसेतु आवारी, कैलास शेळके, बापूसाहेब गायकवाड , अजित पवार, समीर शेख, कबीर शेख, अनिल पिंपळे, चांडे सर, जाधव सर, अमित चव्हाण, गुलजार शेख, विश्वेशा मिस्किन, नेहा मोरे, साक्षी मोरे यांनी काम पाहिले.

# देवदैठण विद्याधामला शालेय क्रिकेट स्पर्धेत दुहेरी यश

### १४ वर्ष मुले व १७ वर्ष मुली विजेते



(छाया - शरद रसाळ, सुपा)

सुपा : प्रतिनिधी

**श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेच्या क्रिकेट संघांनी दोन गटात विजेतेपद मिळवत दुहेरी यश संपादन केले.**

नुकत्याच परिक्रमा संकुल काष्टी या ठिकाणी श्रीगोंदा तालुकास्तरीय शालेय लेदर बॉल क्रिकेट स्पर्धा संपन्न झाल्या यात विद्याधाम प्रशालेच्या १४ वर्ष मुलांच्या संघाने तर १७ वर्ष मुलींच्या संघाने विजेतेपद पटकावले.

मुलांच्या संघाने लोणी व्यंकनाथ संघाचा ८ गडी राखून पराभव करत विजयश्री खेचून आणली. यात जुनैद पठाण ,करण ठाणगे, सार्थक भोस, समर्थ मखरे, धीरज हानवते या छोट्या खेळाडूंनी फलंदाजी व गोलंदाजी चमक दाखवत यश मिळवले.

१७ वर्षे वयोगटात साक्षी बनकर, समीक्षा वाळुंज, ज्योती गव्हाणे ,नागेश्वरी वाघमारे, श्रावणी कांडेकर यांनी उत्कृष्ट खेळ करत उक्कडगाव व लोणी व्यंकनाथ संघाचा पराभव करत विजेतेपद मिळवले.

या दोन्ही संघांची कोकमठाण येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय शालेय लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली आहे .ते या स्पर्धेत श्रीगोंदा तालुक्याचे नेतृत्व करणार आहेत.

या खेळाडूंना क्रीडाशिक्षक संदीप घावटे, सतीश झांबरे, अमोल कातोरे, सतीश कौठाळे, कांता मांडगे, सोनाली वाघमारे यांचे मार्गदर्शन लाभले.

या सर्वांचे शिरूर शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे अध्यक्ष अनिल बोरा, सचिव नंदकुमार निकम सर, शाळा समितीचे अध्यक्ष चंदुलाल चोरडिया, क्रीडा समितीचे अध्यक्ष सचिन जामदार, मुख्याध्यापक विशाल डोके, पर्यवेक्षक नामदेव डुंबरे यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या आहेत.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S) Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com